**CNR No. :- MHSI100001412025**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. २९/२०२५ :–

## –: निशाणी ४६ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(२) नुसार दाव्यात दुरुस्ती होऊन मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा दावा मिळकतीतील जमिन मिळकतीत वादी कं. १ चा १/३ हिस्सा आहे व घर मिळकतीत वादी कं. १ व २ यांचा मिळून १/३ हिस्सा आहे असा हक्कप्रस्थापनेचा ठराव होवुन दावा मिळकतीतील वादीच्या वर नमुद केल्याप्रमाणे हिश्याचे सरस–निरस धडेवाटप होवुन पृथक कब्जा मिळावा, याकरीता तसेच तदनुषंगीक दादींसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील 'ब' मिळकतीपैकी सर्व्हे नं. ३७/१ व ४२/१ या मिळकतीतील मयत खातेदार कै. अनंत कृष्णा शिरोडकर यांचे वारस म्हणुन प्रतिवादी कं. ७अ व ७ब यांचे नाव नमुद केलेले आहे सदर प्रकरणी मागिल लोकअदालतीत प्रतिवादी क्र.७अ हा हजर होता व त्याने त्याचे वडील कै. अनंत कृष्णा शिरोडकर यास ७अ व ७ब व्यतिरीक्त आणखी एक वारस म्हणजेच कु. निर्मला अनंत शिरोडकर विवाहानंतरचे नाव मनिषा महेश कांबळी ही आहे, अशी माहीती दिली. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी असल्याने सदर कु. निर्मला अनंत शिरोडकर विवाहानंतरचे नाव मनिषा महेश कांबळी ही प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार आहे.

सदर दावा दाखल करताना वादीस सदर बाबत माहीती नसल्याने तिचे नाव प्रतिवादी सदरात नमुद करणे राहुन गेले होते. त्यामागे वादीचा कोणताही गैरहेतू नव्हता.

प्रतिवादी कं. ७ क) सौ. मनिषा महेश कांबळी,
विवाहापुर्वीचे नाव निर्मला अनंत शिरोडकर,
वय सु ५१ वर्षे, धंदा– गृहीणी,
रा. नाईकवाडा, कंळगुट, ता. बार्देझ, उत्तर गोवा,
गोवा पिनः– ४०३ ५१६.

वर नमुद केल्याप्रमाणे नाव नमुद होणे व त्याप्रमाणे दुरुस्ती करणे योग्य व आवश्यक असल्याने सदर दाव्यातील दाव्यातील प्रतिवादी कं. ७ब नंतर प्रतिवादी कं. ७क वाढवुन त्यात वर नमुद केल्याप्रमाणे पक्षकार वाढवण्याची व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांचे प्रस्तुत अर्जाकामी म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी यांना प्रस्तुत अर्जाकामी म्हणणे दाखल करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांचे म्हणणे विहीत मुदतीत दाखल न केल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुद्ध विना म्हणणे चालविणेत आला.

०४. अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता वादी मागत असलेली दुरुस्ती दावा गुणदोषावर निकाली करणेकरीता महत्वाची असल्याचे दिसून येते. वादीच्या दुरुस्तीमुळे

दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे दावा परीणामकारकरीत्या निकाली करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हा सन २०२५ मध्ये दाखल केलेला असून सदरची दुरुस्ती ही विलंबाने मागत आहे. वादीच्या या कृत्यामुळे न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया गेलेला आहे. परंतु, सदर कारणास्तव वादी दाव्यात मागत असल्याप्रमाणे दुरुस्ती नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. अर्ज नामंजूर केल्यास अर्जाच्या अनुषंगाने करावी लागणारी विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती करावी लागणार आहे. वादीने केलेल्या विलंबाबाबत खर्चाच्या स्वरुपात परीमार्जन होणारे आहे. सबब, खालीलप्रमाणे पारीत करण्यात येत आहे:-

**-:: <u>आदेश</u> ::-**

१. न्यायाचे कारणे रक्कम रु.२००/- (रुपये दोनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी क्र. ४६ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय सदर खर्चाची रक्कम रु.२००/- (रुपये दोनशे मात्र) भरणा केल्यावर; अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती केल्यावर तशी दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. सदर अर्जाकामी झालेली खर्चाची रक्कम रु. २००/-(रुपये दोनशे मात्र) ही मोफत विधी सेवा प्राधिकरण (Free

Legal Aid) यांच्या कार्यालयात जमा करावयाची आहे.

४. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.03.10 18:08:42 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – १०.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

दोडामार्ग.